जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 AUG 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक महामेरू हरपला : कुलगुरू डॉ. राजनीश कामत

**कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज ) :**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारे महामेरू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी शोकभावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केली.



कुलगुरू डॉ. कामत यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात अतिशय महत्त्वाचे योगदान दिले. राज्याबरोबरच देशाच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी अत्यंत ध्येयनिष्ठपणे काम करीत असताना व्यावसायिक शिक्षणाचा विकास व विस्तार यांसाठी त्यांनी अव्याहत परिश्रम घेतले. त्यांच्या या परिश्रमातूनच डी.वाय. पाटील समूहाचा शैक्षणिक वृक्ष विस्तारला. व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवाहात सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांचे समावेशन डॉ. पाटील यांच्यामुळे शक्य झाले. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांना सन २०१५ मध्ये डी.लिट. ही सर्वोच्च पदवी देऊन गौरविले. त्याचप्रमाणे सन २०२२ मध्ये विद्यापीठाचा प्राचार्य डॉ. रा.कृ. कणबरकर पुरस्कारही प्रदान केला. या पुरस्काराच्या रकमेच स्वतःकडील दहा लाख रुपयांच्या निधीची भर घालून संत साहित्याच्या क्षेत्रात प्रभावी कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना सुरू करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यानुसार विद्यापीठाने पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील पुरस्कार' प्रदान करण्यास सुरवात केली. डॉ. पाटील यांचा शिवाजी विद्यापीठ परिवाराशी प्रगाढ स्नेह होता. हा स्नेहभाव अखेरच्या क्षणापर्यंत कायम राहिला. त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारावर दुःखाची छाया पसरली आहे. डॉ. पाटील यांना चिरशांती लाभो, अशी भावनाही कुलगुरूंनी व्यक्त केली आहे.

0 5 AUG 2026

सकाळ

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक महामेरू हरपला आहे. व्यावसायिक शिक्षणाचा विकास व विस्तार यासाठी त्यांनी अव्याहत परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना त्यांनी व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवाहात आणले. शिवाजी विद्यापीठाने त्यांना २०१५ मध्ये डी. लिट. ही पदवी देऊन गौरविले. प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कारही प्रदान केला. पुरस्काराच्या रकमेत भर घालून त्यांनी संत साहित्याच्या क्षेत्रात प्रभावी कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना सुरू केली आहे.

**- डॉ. रजनीश कामत,**

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

05 AUG 2026

लोकमत

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रातील एक महामेरू हरपला. त्यांनी आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाच्या विस्तारासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून शिवाजी विद्यापीठाने २०१५ मध्ये त्यांना डी. लिट. ही सर्वोच्च पदवी, तर २०२२ मध्ये प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान केला होता.

**डॉ. राजनीश कामत,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

05 AUG 2026

जनप्रवास

# शैक्षणिक महामेरू हरपला

शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारे महामेरू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांनी अत्यंत ध्येयनिष्ठपणे काम करीत असताना व्यावसायिक शिक्षणाचा विकास व विस्तार यासाठी परिश्रम घेतले.

– डॉ. राजनीश कामत (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

0 5 AUG 2026
तरुण भारत

# शिक्षणाचा महामेरू हरपला

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने शिक्षणाचा महामेरू काळाच्या पडद्याआड गेला आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात त्यांनी योगदान दिले आहे. देशाच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी अत्यंत ध्येयनिष्ठपणे अव्याहत परिश्रम घेतले. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांना सन २०१५ मध्ये डी. लिट. ही सर्वोच्च पदवी देऊन गौरविले. त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारावरही दुःखाची छाया पसरली आहे.

■ डॉ. राजनीश कामत, कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 5 AUG 2026

पुढारी

आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात डॉ. पाटील यांचे योगदान मोलाचे असून व्यावसायिक शिक्षणाचा विस्तार त्यांनी घडवून आणला. शिवाजी विद्यापीठ परिवाराशी त्यांचा प्रगाढ स्नेह होता. तो अखेरच्या क्षणापर्यंत कायम राहिला.

**- डॉ. आर. के. कामत,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

0 5 AUG 2026

**Speed news 24 channel's post**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Speed news 24 channel
6m ·

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक महामेरू हरपला: कुलगुरू डॉ. राजनीश कामत

कोल्हापूर : ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारे महामेरू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी शोकभावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश काम यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. कामत यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात अतिशय महत्त्वाचे योगदान दिले. राज्याबरोबरच देशाच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी अत्यंत ध्येयनिष्ठपणे काम करीत असताना व्यावसायिक शिक्षणाचा विकास व विस्तार यांसाठी त्यांनी अव्याहत परिश्रम घेतले त्यांच्या या परिश्रमातूनच डी.वाय. पाटील समूहाचा शैक्षणिक वृक्ष विस्तारला. व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवाहात सर्व स्तरांती विद्यार्थ्यांचे समावेशन डॉ. पाटील यांच्यामुळे शक्य झाले. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांना सन २०१५ मध्ये डी.लिट. ही सर्वोच्च पदवी देऊन गौरविले. त्याचप्रमाणे सन २०२२ मध्ये विद्यापीठाचा प्राचार्य डॉ. रा.कृ. कणबरकर पुरस्कारही प्रदान केला. या पुरस्काराच्या रकमेच स्वतःकडील दहा लाख रुपयांच्या निधीची भर घालून संत साहित्याच्या क्षेत्रात प्रभावी कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना सुरू करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती त्यानुसार विद्यापीठाने 'पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील पुरस्कार' प्रदान करण्यास सुरवात केली. डॉ. पाटील यांचा शिवाजी विद्यापीठ परिवाराशी प्रगाढ स्नेह होता. हा स्नेहभाव अखेरच्या क्षणापर्यंत कायम राहिला. त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारावर दुःखाची छाया पसरली आहे. डॉ. पाटील यांना चिरशांती लाभो, अशी भावनाही कुलगुरूंनी व्यक्त केली आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी
0 5 AUG 2026

# जन्मभूमी, कर्मभूमीतील सन्मान महत्त्वाचा

## पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी व्यक्त केली होती शिवाजी विद्यापीठातील समारंभात कृतज्ञ भावना






**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**शिक्षणमहर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारालाही मोठा धक्का बसला. 'दादा' या नावाने सुप्रसिद्ध असणाऱ्या डॉ. पाटील यांच्या अनेक स्मृतींना या निमित्ताने उजाळा देण्यात येत होता.**

शिवाजी विद्यापीठाने जानेवारी २०१५ मध्ये झालेल्या ५१ व्या दीक्षान्त समारंभामध्ये शिक्षणमहर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय पाटील यांना डी.लिट. ही विद्यापीठाची सर्वोच्च पदवी देऊन गौरवले होते. या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर होते. तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना डी.लिट. पदवी प्रदान करण्यात आली होती. यावेळी तत्कालीन परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. नारळीकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे आणि कुलसचिव डॉ. डी. व्ही. उपस्थित होते. यावेळी डॉ. डी. वाय. पाटील यांनी, मला आतापर्यंत अनेक विद्यापीठांनी डी.लिट. दिली. राज्यपाल असताना मी अनेकांना डी.लिट. प्रदान केली; परंतु आज माझ्या जन्मभूमी व कर्मभूमीतील विद्यापीठाने माझा सन्मान केला, ही बाब माझ्यासाठी महत्त्वाची आहे. त्याबद्दल मी शिवाजी विद्यापीठाचा कृतज्ञ असल्याची भावना व्यक्त केली होती.

**गुरूकडून शिष्याचा सन्मान :**

१३ एप्रिल २०२२ रोजी पद्मश्री डी. वाय. पाटील यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तत्कालीन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शांतादेवी डी. पाटील आणि प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत मंचावर उपस्थित होते.

यावेळी डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले होते की, प्राचार्य कणबरकर हे माझे गुरू आहेत. गुरूंच्या नावे असणारा पुरस्कार मला मिळाला, यामुळे उपकृततेची भावना मनी दाटली आहे. पूर्वी गुरूदक्षिणा दिली जायची; पण आज गुरूकडून शिष्याचा सन्मान झाला आहे, हे या पुरस्काराचे वेगळेपण आहे. तसेच डॉ. डी. वाय. पाटील यांनी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत आणखी १० लाख रुपयांची भर घालून तो निधी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्याची घोषणा केली.

### शैक्षणिक महामेरू हरपला

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारे महामेरू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात अतिशय महत्त्वाचे योगदान दिले. राज्यासह देशाच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी अत्यंत ध्येयनिष्ठपणे काम करताना व्यावसायिक शिक्षणाचा विकास व विस्तार यासाठी अव्याहत परिश्रम घेतले. त्यांच्या या परिश्रमातूनच डी. वाय. पाटील समूहाचा शैक्षणिक वृक्ष विस्तारला. व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवाहात सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांचे समावेशन डॉ. पाटील यांच्यामुळे शक्य झाले. - कुलगुरू डॉ. राजनीश कामत

5 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# कर्मभूमीतील विद्यापीठाकडून झालेला सन्मान महत्त्वाचा

## पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी व्यक्त केली होती कृतज्ञ भावना

ोल्हापूर, (महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज ) :

शिक्षण महर्षी पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील यांच्या ाधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारालाही मोठा धक्का सला. दादा' या नावाने सुप्रसिद्ध असणाऱ्या डॉ. ाटील यांच्या अनेक स्मृतींना या निमित्ताने उजाळा ण्यात येत होता.

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभांसह विविध ार्यक्रमांना शक्य असेल त्यावेळी डॉ. डी.वाय. पाटील आवर्जून उपस्थित राहात असत. इथल्या अधिकारी, र्मचारी यांच्याशीही त्यांचे आपुलकीचे नाते निर्माण ाले होते. विद्यापीठ परिवारातील घटकांना ते आपलेच ाटत असत. दादांच्या वाढदिवशी त्यांना शुभेच्छा ण्यासाठी विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह र्मचारीही आवर्जून भेटीसाठी जात असत. इतका नेहभाव दादांनी अखेरच्या क्षणापर्यंत जपला.

शिवाजी विद्यापीठाने जानेवारी २०१५ मध्ये ालेल्या ५१ व्या दीक्षान्त समारंभामध्ये शिक्षणमहर्षी द्मश्री डॉ. डी.वाय पाटील यांना डी.लिट. ही द्यापीठाची सर्वोच्च पदवी देऊन गौरविले होते. या ीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत ारळीकर होते. (छायाचित्रात) तत्कालीन कुलगुरू ॉ. एन.जे. पवार यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना ी.लिट. पदवी प्रदान करण्यात आली होती. सोबत डावीकडून) तत्कालीन परीक्षा नियंत्रक महेश काकडे, ॉ. नारळीकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे आणि ुलसचिव डॉ. डी.व्ही. मुळ्ये दिसत आहेत.




यावेळी डॉ. डी.वाय. पाटील यांनी, मला ातापर्यंत अनेक विद्यापीठांनी डी. लिट. दिली. ाज्यपाल असताना मी अनेकांना डी. लिट. प्रदान ेली; परंतु आज माझ्या जन्मभूमी व कर्मभूमीतील द्यापीठाने माझा सन्मान केला, ही बाब माझ्यासाठी हत्त्वाची आहे. त्याबद्दल मी शिवाजी विद्यापीठाचा ृतज्ञ असल्याची भावना डॉ. डी. वाय. पाटील व्यक्त केली होती. त्याचप्रमाणे, शिवाजी विद्यापीठाकडून दर्जेदार विद्यार्थी घडविला जात आहे. त्याचा फायदा विधायक समाजनिर्मितीसाठी होत आहे. मानवाच्या जीवनात ज्यावेळी अहंकाराचा मृत्यू होतो, त्यावेळी त्याचे खरे जीवन सुरू होते. ध्येय निश्चित असल्यास यश मिळते. ज्ञानासाठी धडपड करावी. ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी पुस्तके वाचावी, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले होते.

### गुरूकडून शिष्याचा सन्मान

दि. १३ एप्रिल २०२२ रोजी पद्मश्री डी.वाय. पाटील यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा.कृ. कणबरकर पुरस्कार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. यावेळी (छायाचित्रात डावीकडून) कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तत्कालीन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शांतादेवी डी. पाटील आणि प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत मंचावर उपस्थित होते.

यावेळी डॉ. डी.वाय. पाटील यांनी म्हटले होते की, प्राचार्य कणबरकर सर हे माझे गुरू आहेत. गुरूंच्या नावे असणारा पुरस्कार मला मिळाला, यामुळे उपकृततेची भावना मनी दाटली आहे. त्यामुळेच अन्य पुरस्कारांपेक्षा हा पुरस्कार माझ्यासाठी खूप वेगळा आणि जवळचा आहे. पूर्वी गुरूदक्षिणा दिली जायची, पण आज गुरूकडून शिष्याचा सन्मान झाला आहे, हे या पुरस्काराचे वेगळेपण आहे, अशी भावना व्यक्त केली होती.

तसेच, डॉ. डी.वाय. पाटील यांनी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत आणखी १० लाख रुपयांची भर घालून तो निधी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्याची घोषणा केली. या निधीमधून संतसाहित्याच्या क्षेत्रात प्रभावी काम करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. डॉ. पाटील यांच्या हस्तेच सदर ११ लाख ५१ रुपये इतक्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला होता. त्यामधून सदर पुरस्कार योजना डॉ. डी. वाय. पाटील यांच्याच नावे विद्यापीठाने कार्यान्वित केली आहे.

0 5 AUG 2026
लोकसत्ता

# हा तर गुरूकडून शिष्याचा सन्मान!

## डॉ. डी. वाय पाटील यांच्या भाषणाची आठवण...




**शिवाजी विद्यापीठाने डॉ. डी. वाय. पाटील यांना डी. लिट. पदवी देऊन गौरविले होते.**

दयानंद लिपारे, लोकसत्ता

**कोल्हापूर :** पद्मश्री डी. वाय. पाटील यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते १३ एप्रिल २०२२ रोजी प्रदान करण्यात आला होता. या वेळी डॉ. डी. वाय. पाटील यांनी म्हटले होते, की प्राचार्य कणबरकर सर हे माझे गुरू आहेत. गुरूंच्या नावे असणारा पुरस्कार मला मिळाला. त्यामुळे उपकृततेची भावना मनी दाटली आहे. त्यामुळेच अन्य पुरस्कारांपेक्षा हा पुरस्कार माझ्यासाठी खूप वेगळा आणि जवळचा आहे. पूर्वी गुरुदक्षिणा दिली जायची, पण आज गुरूकडून शिष्याचा सन्मान झाला आहे, हे या पुरस्काराचे वेगळेपण आहे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तत्कालीन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शांतादेवी डी. पाटील आणि प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत मंचावर उपस्थित होते.

### निधीतून पुरस्कार

तसेच, डॉ. डी. वाय. पाटील यांनी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत आणखी १० लाख रुपयांची भर घालून तो निधी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्याची घोषणा केली. या निधीमधून संतसाहित्याच्या क्षेत्रात प्रभावी काम करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. डॉ. पाटील यांच्या हस्तेच या ११ लाख ५१ रुपये इतक्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला होता. त्यामधून सदर पुरस्कार योजना डॉ. डी. वाय. पाटील यांच्याच नावे विद्यापीठाने कार्यान्वित केली आहे.

### डी. लिट. प्रदान

शिवाजी विद्यापीठाने जानेवारी २०१५ मध्ये झालेल्या ५१ व्या दीक्षान्त समारंभामध्ये शिक्षणमहर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना डी. लिट. ही विद्यापीठाची सर्वोच्च पदवी देऊन गौरविले होते. या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर होते. तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना डी. लिट. प्रदान करण्यात आली होती. सोबत तत्कालीन परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. नारळीकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे आणि कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळ्ये उपस्थित होते. डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारालाही मोठा धक्का बसला. 'दादा' या नावाने सुप्रसिद्ध असणाऱ्या डॉ. पाटील यांच्या अनेक स्मृतींना या निमित्ताने उजाळा देण्यात येत होता. शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभासह विविध कार्यक्रमांना शक्य असेल त्या वेळी डॉ. डी. वाय. पाटील आवर्जून उपस्थित राहत असत. इथल्या अधिकारी, कर्मचारी यांच्याशीही त्यांचे आपुलकीचे नाते निर्माण झाले होते. विद्यापीठ परिवारातील घटकांना ते आपलेच वाटत असत.

### कर्मभूमीतील गौरव मोलाचा

या वेळी डॉ. डी. वाय. पाटील यांनी, मला आतापर्यंत अनेक विद्यापीठांनी डी. लिट. दिली. राज्यपाल असताना मी अनेकांना डी. लिट. प्रदान केली; परंतु आज माझ्या जन्मभूमी व कर्मभूमीतील विद्यापीठाने माझा सन्मान केला, ही बाब माझ्यासाठी महत्त्वाची आहे. त्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचा कृतज्ञ आहे, अशी भावना व्यक्त केली होती.

05 AUG 2026
पुढारी




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे डी.लिट. पदवी स्वीकारताना डॉ. डी. वाय. पाटील.**

# कर्मभूमीतील शिवाजी विद्यापीठाचा सन्मान माझ्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचा

## डॉ. डी. वाय. पाटील यांनी व्यक्त केली होती कृतज्ञता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने २०१५ मध्ये झालेल्या ५१ व्या दीक्षान्त समारंभात डॉ. डी. वाय. पाटील यांना विद्यापीठाची सर्वोच्च डी.लिट. पदवी प्रदान करून गौरविले होते. त्यावेळी त्यांनी, 'अनेक विद्यापीठांनी मला डी.लिट. दिली; मात्र माझ्या जन्मभूमी आणि कर्मभूमीतील विद्यापीठाने केलेला हा सन्मान माझ्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचा आहे,' अशी कृतज्ञ भावना व्यक्त केली होती.

१३ एप्रिल २०२२ रोजी त्यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. 'हा पुरस्कार माझ्या गुरूंच्या नावाने असल्याने तो माझ्यासाठी सर्व पुरस्कारांपेक्षा वेगळा आहे. आज गुरूंकडून शिष्याचा सन्मान झाला आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली होती. यावेळी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत स्वतःकडील १० लाख रुपये जोडून त्यांनी ११ लाख ५१ हजार रुपयांचा निधी विद्यापीठाला दिला. या निधीतून संत साहित्य क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी पुरस्कार योजना सुरू करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. विद्यापीठाने त्यांच्या नावाने ही पुरस्कार योजना कार्यान्वित करून त्यांच्या शैक्षणिक व समाजाभिमुख कार्याला कायमस्वरूपी अभिवादन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 AUG 2026

जनप्रवास




शिवाजी विद्यापीठाकडून मानद डी. लिट. पदवी स्वीकारताना डी. वाय. पाटील.

0 5 AUG 2026

लोकमत




पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे शिवाजी विद्यापीठाशी अतूट आणि जिव्हाळ्याचे नाते होते. विद्यापीठाने २०१५ मध्ये त्यांना डी. लिट. ही सर्वोच्च मानद पदवी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या उपस्थितीत तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते बहाल केली होती. त्यावेळी त्यांनी, 'जन्मभूमी आणि कर्मभूमीतील विद्यापीठाकडून झालेला हा सन्मान माझ्यासाठी सर्वाधिक मोलाचा आहे,' अशी भावना व्यक्त केली होती.

0 5 AUG 2026

सकाळ




पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना शिवाजी विद्यापीठाची डी.लिट. ही पदवी प्रदान करताना तत्कालीन कुलगुरू डॉ. एन.जे. पवार. सोबत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे आणि कुलसचिव डॉ. डी.व्ही. मुळ्ये आदी.

महा न्यूज & व्यूज

वामाक्षी
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# डॉ. डी.वाय. पाटील: ज्ञानदेवांचे पसायदान मुरलेले व्यक्तीमत्त्व

कोल्हापूर (महा न्यूज अॅण्ड व्यूज) :

(शिवाजी विद्यापीठाने पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना दि. २९ जानेवारी २०१५ रोजी झालेल्या ५१ व्या दीक्षान्त समारंभात डी.लिट. ही सन्मानदर्शक सर्वोच्च पदवी देऊन गौरविले. त्यावेळी डॉ. पाटील यांना प्रदान करण्यात आलेले गौरवपत्र...)

शैक्षणिक, सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वाचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविणारे, राजकीय क्षेत्रात अत्यंत निःस्पृह वृत्तीने राहून यशोशिखरे सर करणारे, बिहार आणि त्रिपुरा या राज्याचे राज्यपालपद यशस्वीपणे भूषविलेले आणि स्वतःच्या कार्याचा ठसा अखिल भारतीय पातळीवर उमटवून नावलौकिक प्राप्त करणारे, कोल्हापूरच्या वैभवशाली परंपरेला अधिक समृध्द आणि देदिप्यमान करणारे, उंच यशोशिखरावर आरूढ झालेले अत्यंत विनयशील व्यक्तिमत्त्व म्हणजे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील तथा दादा.

जन्मतःच सामाजिकतेचे भान असलेले आणि दुःखी जनांच्या सांत्वनासाठी, अज्ञान अंधःकारात पिचत पडलेल्या समाजासाठी शिक्षणाचा प्रारंभ झाला पाहिजे असे, मौलिक विचारचिंतन करणारे, अवघ्या समष्टीचा विचार हाच ज्यांचा ध्यास आहे, असे थोर, झळझळीत रत्न या कोल्हापूरच्या मातीच्या कुशीत जन्मले ते म्हणजे पद्मश्री डॉ. डी. वाय. पवार पाटीलसाहेब हे होत.

डी. वाय. पाटीलसाहेब! शेतकऱ्यांचे कैवारी, गरिबांचे वाली, प्रतिष्ठित शेतकरी आणि साऱ्या पंचक्रोशीत ज्यांना 'बावड्याचे आबा' म्हणून ओळखले जात असे, त्या आध्यात्मिक वृत्तीच्या यशवंतराव या पित्याच्या आणि वत्सलाबाई या मातेच्या पोटी २२ ऑक्टोबर १९३५ रोजी आपला जन्म झाला. आपण केवळ सात वर्षाचे असताना १९४२ मध्ये आपल्या मातोश्री देवाघरी गेल्या आणि ६ फेब्रुवारी १९५४ रोजी वडिलांचा मृत्यू झाला. आईवडिलांचा मृत्यू हा आपल्यावर झालेला वज्राघात होता. प्राप्त परिस्थितीला आपण धैर्याने सामोरे गेलात आणि शिक्षण अर्धवट सोडून आपण मोठ्या हिमतीने शेतीची आणि घराची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतलीत. आपण स्वतःला सावरून शेतीत लक्ष घातलंत. शेतीबरोबरच-लाल मातीची मशागत सुरू झाली, नामवंत मल्ल म्हणून अल्पकाळात लौकिक प्राप्त केला. कुस्तीबरोबर, क्रिकेट हा देखील आपला आवडता खेळ होता कुस्तीमुळे आपलं शरीर बलदंड झालं आणि क्रिकेटमुळे ते पोलादी बनलं.



परिपक्वता, प्रगल्भता या सर्वांचा सुमेळ विचारपूर्वक घालावा लागतो. अशी निर्णयक्षमता आपण मिळवली, म्हणूनच आपण नवनव्या वाटा शोधल्या, आपण राजकारण स्वीकारले तेही समाजकारणासाठीच. लोकविकास हेच त्याचे मूळ सूत्र होते. आपल्या राजकारणातील अकरा वर्षे जनसामान्यांच्या जीवनातील समस्या सोडवण्यासाठी वेचली. डोंगराळ, मागास, अडाणी, उपेक्षित, दुर्लक्षित भागांचा विकास हाच आपला ध्यास होता. म्हणूनच आपल्या कार्यकर्तृत्त्वाने भारावलेली निरपेक्ष लोकशक्ती आपल्या पाठीशी उभी राहिली, असा लोकजिव्हाळा उगाच मिळत नाही. त्यासाठी निर्मम वृत्तीने वागावे लागते. आचरण शुद्ध राहावे लागते. निर्वैर वृत्तीने प्रत्येक पाऊल टाकावे लागते. आपण अष्टावधानी वृत्तीने हे साधले आहे.

आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरूवात १९५७ ला झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा तो काळ. या काळात कोल्हापुर म्युनिसिपल कौन्सिलवर कॉंग्रेसचा फक्त एक नगरसेवक निवडून आला. तो नगरसेवक म्हणजे डी. वाय. पाटील! एवढी लोकप्रियता आपण त्या काळात मिळवलेली होती. त्यानंतर आपण अनेक पदांवर काम केले. १९६७ ते १९६८ या काळात आपण महाराष्ट्र विधानसभेचे सन्माननीय सदस्य होतात. १९८८ पासून आपण भारत मॉरीशस ब्रदरहूड ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून काम पहात आहात. आपल्या नेतृत्वाखाली हे मैत्रबंध खूपच दृढ झाले आहेत. अनेक जबाबदाऱ्या आपल्या राजकीय कारकिर्दीत आपण स्वीकारल्या आणि त्या आपण समर्थपणे पार पाडल्यात. परंतु आपण राजकारणात फार काळ रमला नाहीत.

पाटीलसाहेब, आपला पिंड मुळात राजकीय नेता म्हणून नव्हता. समाजाभिमुख व्यापक जनहितासाठी कळवळा असलेल्या मनस्वी साधकाचा हा मनोधर्म होता. मतदारांकडे 'मतदाता' म्हणून पाहणाऱ्या

(१९८५-८७) तसेच पुणे विद्यापीठ (१९८९-१९९१) आणि शिवाजी विद्यापीठ (१९९०-१९९३) यांच्या सिनेटचे सदस्य म्हणूनही काम केले आहे. एआयसीटीईच्या वेस्टर्न रिजनचे चेअरमन म्हणून १९९४-१९९८ या काळात आपण उत्कृष्ट काम केले आहे.

आपण शिक्षण क्षेत्रात पदार्पण केलेत आणि महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राचा चेहरा मोहराच बदलून टाकला. जागतिक घटितांच्या संदर्भातून नवनिर्माण सुरू झाले. एकविसाव्या शतकाच्या अवघ्या पटावर आत्मविश्वासाने पावले टाकणारी समर्थ अशी नवी पिढी घडत राहिली, घडत राहील. आपल्या मार्गदर्शनाखाली डी. वाय. शिक्षण समूहाने शिक्षणक्षेत्रात गरूडभरारी घेतली आहे. आर्टस, कॉमर्स, वैद्यकिय, अभियांत्रिकी, फार्मसी, आय.टी., आर्किटेक्चर, कृषी व हॉस्पिटॅलिटी अशा सर्वच क्षेत्रातील शिक्षणसाठीच्या सर्व सोयीसुविधा आपण उपलब्ध करून दिल्या. आज आपल्या नावे तीन अभिमत विद्यापीठे कार्यरत आहेत. आणि त्याअंतर्गत १५० हून अधिक शैक्षणिक केंद्रे उभी आहेत. त्यामधून २ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी अध्ययन करीत आहेत.

आपण एवढ्यावर थांबला नाहीत, तर त्रिपुराच्या राज्यपालपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्रिपुरा हे एज्युकेशन हब म्हणून विकसित करण्यास आपण सुरूवात केली. त्यास आज मूर्त स्वरूप आले असून तेथे दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, दोन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू झाली आहेत. त्रिपुरा विद्यापीठाची स्थापनाही आपण केली. तथापि, आपल्या मनात घर करून असलेला शेतकरी आपणास शांत बसू देत नव्हता. राजभवनातच ऊस लागवडीचा प्रयोग सुरू केला आणि त्रिपुरामधील शेतकऱ्यांना ऊस लागवडीस प्रोत्साहन दिले. त्रिपुरावासियांना फक्त आपण सहकाराचा मंत्र सांगितला नाही, तर सहकारामधून विकास कसा साधता येतो याचे प्रत्यक्ष दर्शन घडावे, म्हणून त्रिपुराच्या शिष्टमंडळास कोल्हापुरातील 'गोकुळ दूध प्रकल्प' पाहण्यासाठी पाठविले आणि त्या प्रकल्पास गती दिली. त्रिपुरामधील हायकोर्ट बेंचही आपल्याच प्रयत्नाने सुरू झाले. काही काळ आपणास बिहारचे राज्यपाल म्हणूनही काम करण्याची संधी मिळाली. मिळालेल्या संधीचे सोने करण्याची आपली जीवनपद्धती असल्याने आपण तेथे पाटणा येथील गंगा नदीवर लिफ्ट इरिगेशन सुरू करून दाखविले. बारा खाजगी साखर कारखाने बंद पडले होते. त्यांना प्रोत्साहन दिले. परिणामी बंद साखर

अर्धवट राहिलेलं शिक्षण पूर्ण करण्यासाठी आपण कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन बी.ए. ही पदवी घेतली आणि पुढे शिवाजी विद्यापीठाच्या एल.एल.बी. या परीक्षेत आपण प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालात. तसेच राज्यशास्त्र एम.ए. ही पदवी आपण पुणे विद्यापीठातून प्राप्त केली. वयाच्या १९ व्या वर्षी आपण सहकार आणि राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. कोल्हापूर जिल्हा मार्केटिंग कमिटीचे चेअरमन, शेतकरी सहायक मंडळाचे अध्यक्ष अशी मानाची पदे आपल्यापर्यंत चालत आली, १९६४ साली कैरो व युगोस्लाव्हिया येथे भरलेल्या युथ कॉन्फरन्ससाठी आपण प्रतिनिधित्व केले. कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी काळम्मावाडी धरण झाले पाहिजे म्हणून शेतकऱ्यांना सोबत घेऊन लढा उभा केला. त्यासाठी आपली आमदारकी पणाला लावली आणि त्या कामात आपण यशस्वी झालात.

शेती महामंडळाचे संचालक, इंटकचे अध्यक्ष, रेल्वे सल्लागार मंडळाचे सदस्य, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान कमिटीचे चेअरमन अशा विविध पदांवर आपण १९७२ पासून सतत कार्यरत राहिलात.

आपणास भूतकाळाचा आधार असला तरी त्यातच रमून न जाता आपण वर्तमानातून उज्वल भविष्याचा वेध घेतला. कोणतेही सामर्थ्य हे नित्यकर्मातून मिळते असे मानून कर्मसाधना केली. प्रारब्ध हे काही आकाशातून पडत नाही, आपल्या सत्त्वशील कर्मातूनच ते साकार होते. अशी मनोमनी खूणगाठ बांधून आपण समाजाच्या उत्कर्षाच्या क्षितिजाकडे झेपावत राहिलात.

आपल्या अंतःकरणात गोरगरीब, दुःखीत, वंचित यांच्याविषयी अपार करूणा असल्याने त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ऐन तारुण्यात चळवळ उभी केली. अशा चळवळी उभ्या करताना आपण सतत भलेपणाची, सच्चेपणाची सोबत केली. कोल्हापूर शुगर मिल हा खाजगी मालकीचा कारखाना शेतकऱ्यांच्या घामाला न्याय देत नाही असे दिसताच आपण त्या अन्यायाचा मुकाबला करण्यासाठी, त्याविरुद्ध लढा उभारण्यासाठी शेतकऱ्यांची संघटना बांधली. महाराष्ट्रातील ही पहिलीच शेतक-यांची संघटना होती. या संघटनेद्वारे अन्यायाविरुध्द लढा उभारला आणि खाजगी कारखाना सहकारी कारखाना व्हावा यासाठी प्रयत्न केला. अशाप्रकारे सहकार तत्त्वाचा पहिला उद्घोष आपण केलात.

वारणेतील चांदोली धरणाच्या चळवळीत आपला सक्रीय सहभाग सर्वपरिचित आहे. धरणग्रस्तांविषयी, विस्थापित होणाऱ्या भूधारकांच्याविषयी आपल्या मनात आस्था होती. काळम्मावाडी धरणाच्या आंदोलनात तर आपण अग्रणी होताच. त्यासाठी आपण त्याची निर्गत लागेपर्यंत अथक परिश्रम केले. सीमाप्रश्नाची चळवळ उभी राहिली, तेव्हा मराठी भाषकांवर होणारा अन्याय पाहून आपण पेटून उठलात आणि विधानसभेत आमदारकीचा राजीनामा देण्याची घोषणा केलीत.

कोरड्या राजकारण्यांच्या पलीकडे आपण उमदेपणाने उभे होता. सर्वस्पर्शी, सर्वांगीण विकासाने समाजऋण फेडता येईल, या प्रांजल भावनेने आपण राजकारण केले. मतलबी, सत्तास्पर्धा, राजकीय डावपेच, भेदाभेद, कपटनीती यांचा स्पर्शही आपल्या मनाला झाला नव्हता. सर्वात्मक समभावाने विकासाची सर्व क्षेत्रे आपण जवळ केलीत. म्हणूनच राजकारणाचा पट सोडल्यानंतर सर्वसामान्यांच्या मनःपटलावर जिव्हाळ्याचे स्थान मिळवता आले. आपल्याविषयी माजी केंद्रीय मंत्री शंकरराव चव्हाण "सत्य, चारित्र्य, प्रामाणिकपणा व ध्येयपूर्तीची जिद्द जीवनाची मूल्ये मानल्याने आज आपण समाजाच्या विश्वासाचे प्रतीक बनले आहात," असे म्हणतात, ते सर्वार्थाने खरेच आहे. राजकारणात कटू अनुभव आल्याने प्रसंगी सत्याचा अपलाप झालेला पाहून आपण राजकारणातून संन्यास घेऊन शैक्षणिक कार्याकडे वळलात. मूलतः मानवी कल्याणाला हितकारक असणारे शिक्षण आपल्या अध्यात्मप्रवण मनाला अधिक भावत होते. साधुसंतांच्या शिकवणुकीचा प्रभाव आपल्या श्रध्दाशील अंतःकरणावर होता. म्हणूनच आपण शिक्षण प्रसाराचा ज्ञानमार्ग अंगीकारला.

दुरितांचे तिमिर जाओ! विश्व स्वधर्म सूर्येपाहो!

जो जे वांछिल तो ते लाहो! प्राणीजात!

हेच संत ज्ञानदेवांचे पसायदान आपल्या व्यक्तिमत्वात मुरलेले आहे, त्या ज्ञानसूर्याची आराधना आरंभण्यापूर्वी म. फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याची मुद्रा आपल्या मनावर ठसली होती. त्यांच्या सामाजिक समतेचा स्फुलिंग आपल्या मनाला चेतवित होता. कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे, पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक कार्याचे प्रत्यक्ष दर्शन आपणास घडले होते. आपण अमर्याद जिद्दीने महाराष्ट्राचे शैक्षणिक अवकाश उजळून टाकलेत.

नित्याचे दूरदर्शी विचारमंथन व नव्याचा शोध घेणाऱ्या विचारांची खंबीर बैठक यामुळे पारंपरिक शिक्षणाची कालबाह्यता ओळखून, गतिमान विज्ञान युगाचा वेध घेऊन आपण तंत्रज्ञान शिक्षणाची कास धरली. आपली क्रिकेटची आवड नव्या मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदान या रुपाने फलद्रूप झाली.

देशविख्यात मौनी विद्यापीठाचा अनुभव आपल्या गाठीशी होताच. शिवाय कर्नाटकातील बंगळूर येथील टी.एम.ए. पै यांची तांत्रिक शिक्षणसंस्था १९६७ साली पाहून तशीच शिक्षण व्यवस्था महाराष्ट्रात झाली पाहिजे, असा ध्यास आपल्या मनाला स्वस्थ बसू देत नव्हता. या विचाराला पूरक व प्रेरणा देणारी घटना १९८३ साली घडली. महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते, सहकार महर्षी मा. वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना विनाअनुदान तत्त्वावर तांत्रिक व वैद्यकिय शिक्षणसंस्था सुरू करण्याचा क्रांतिकारक, कारखाने सुरू झाले. त्रिपुरा आणि बिहारच्या राज्यपालपदाची धुरा सांभाळताना राज्यपालपदाचे मानधन म्हणून फक्त रूपया मानधन स्वीकारण्याचा एक नवीन पायंडा पाडला. हे एक वेगळेपण डी. वाय. या नावातच दडलेले आहे.

विधायक विचार, ज्ञानप्रसाराची दुर्दम्य आकांक्षा, हितचिंतकांची सदिच्छा, संकल्पसिद्धीला पूर्णत्वाला नेणारी अनाकलनीय शक्ती, मानवी करूणा यामुळे आपले हे सामाजिक उत्थानाचे शिक्षणकार्य अधिक व्यापक विशाल रूप घेऊन देशविदेशात महाराष्ट्राचे नाव उज्वल करीत आहे. यामुळेच विदेशातही आपला गौरव झाला. सन्मान मिळाले. १९८८ मध्ये अमेरिकेतील ॲरिझोना विद्यापीठाने आपणास डॉक्टरेट पदवी देऊन आपला सन्मान केला तर १९९६ मध्ये इंग्लंडच्या नॉटिंगहॅम ट्रेंट विद्यापीठानेही आपणास डॉक्टरेट ही सन्माननीय पदवी बहाल केली. अलीकडेच भारतातील काही विद्यापीठांनीही आपणास डॉक्टरेट पदवी देऊ केली आहे. २०१२ साली भुवनेश्वरच्या कलिंगा इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रिअल टेक्नॉलॉजीने आपणास डॉक्टरेट तर महाराष्ट्रातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने २०१४ मध्ये डी. एस्सी. पदवी देऊन आपल्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला आहे.

आपल्या देशानेही पद्मश्री ही बहुमानाची पदवी बहाल करून आपणास सन्मानाने अलंकृत केले आहे. पाटीलसाहेब, आपण राजकारण, समाजकारण, शिक्षण, सहकार, सांस्कृतिक क्षेत्र, कला, क्रीडा, साहित्य इत्यादी क्षेत्रात निर्लोभी वृत्तीने भरघोस असे कार्य केले आहे. निरलसपणे, अखंड व्रत घेऊन आपण माणसं घडवली. समाज घडवला. भौतिकातून आधिभौतिकातून मानव घडणीचे काम केले आहे. ज्ञान हाच आपला श्वास आहे. निगर्वी वृत्ती हा ध्येयधर्म आहे.

आपण विचारवंत शिक्षणमहर्षी, समाजसेवी राजकारणी आहात. भरभरून प्रेम देणारे कलाप्रेमी आहात. मनोज्ञ रसिक आहात. प्रत्येक गोष्टीकडे पाहाण्याचा सकारात्मक दृष्टिकोन असणारे बहुआयामी व्यक्तिमत्वाचे श्रध्दानिष्ठ भक्त आहात. सौंदर्यवादी संवेदनशीलता असलेले आस्वादक आहात. अनेक विचारवंताच्या, समाज सुधारकांच्या, संत महंतांच्या तत्त्वविचारांचा व्यासंग असणारे समृद्ध व्यक्तिमत्व आहात.

आपण एक गुरूकुलच आहात. आपल्या सहवासातले क्षण माणसाला जग विसरायला लावतात. विविध मानसिक स्तरांतील, अनेकविध परिस्थितीच्या अवस्थांतील, अशिक्षितांपासून उच्च विद्याविभूषितांपर्यंत, सामान्य जनांपासून देशाच्या सर्वोच्च पदावरील महनीय व्यक्तिंपर्यंत सारेच आपल्यावर मनापासून प्रेम करताना दिसतात.

पाटीलसाहेब, आपण शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर आहात. शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य म्हणून आपण काम केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात आपण शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, फार्मसी,

कसबा बावड्याच्या श्रीराम सोसायटीला विकासाची योग्य दिशा मिळावी, तिचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक व्हावे, म्हणून अल्प वयातच तिची धुरा आपण सांभाळलीत. दुर्बल, निराधार, असहाय, वंचित, उपेक्षित घटकांविषयी केवळ शाब्दिक, भावनिक, पोकळ आणि भोंगळ असा कैवार आपल्या ठायी कधीच नव्हता. तो आपल्या आत्मिक कर्मनिष्ठेचा सबल उद्गार होता. संकल्पसिध्दीसाठी होकारार्थी मन असणे महत्त्वाचे असते, तसे ते आपले आहे. आपण हाती घेतलेले संकल्पित कार्य आपल्या मनावर अगोदरच पूर्णार्थाने ठसलेले असावे, असे आपले मत आहे.

जीवनात यशस्वी, सुखी, स्थिर व्हायचे असेल तर, आपले विचार, भावना आणि वर्तन यात समतोल असावा. निर्णयक्षमता, जजमेंट,

तितकाच धाडसी निर्णय घेतला गेला. त्यामध्ये सक्रीय सहभागी होण्याचे आपण निश्चित केले, त्यासाठी एक संस्थात्मक संरचनेची गरज होती. ती गरज आपण १९८३ मध्ये रामराव आदिक यांच्या पाठिंब्याने संस्था स्थापना करून भरून काढली. पहिल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उभारणीसाठी आपण स्वतः ची सर्व स्थावर, जंगम मालमत्ता गहाण ठेवली आणि शैक्षणिक कार्याची सुरूवात केली. याचबरोबर आपण महाराष्ट्रातील इतर शिक्षण संस्थांच्या उभारणीत सिंहाचा वाटा उचलला आहे. १९७५ ते १९९४ या काळात आपण गारगोटी, जि. कोल्हापूर येथील मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष होतात. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या कार्यकारिणीचे सदस्य (१९७२-१९७८) मुंबई विद्यापीठ

वैद्यकीय, कृषी अशा विविध शिक्षण शाखांची सुरूवात केली, त्यामधून पिढ्या घडविल्या जात आहेत. कोल्हापूरच्या शैक्षणिक परंपरेत आपल्या माध्यमातून जी चळवळ सुरू झाली आहे, ती फक्त कोल्हापूरपुरती मर्यादित न राहता पुणे, मुंबई, मॉरीशस पर्यंत पोहचली आहे. आपल्या शैक्षणिक दृष्टिकोनाचा फायदा त्रिपुरा आणि बिहार राज्यांनाही मोठ्या प्रमाणात झाला आहे. अशा करवीर नगरीतल्या ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचा सन्मान करण्याची संधी शिवाजी विद्यापीठास मिळत आहे, हा सुयोग आहे. आदरणीय पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटीलसाहेब, मोठ्या कृतज्ञ भावनेने डी. लिट. ही सन्मानदर्शक पदवी शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या वतीने आपणास आज प्रदान करीत आहोत. प्रस्तुत पदवीचा आपण स्वीकार करावा, अशी विनंती आहे.

जनसंपर्क कक्ष

05 AUG 2026

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानगंगेचा भगीरथ कालवश

पान १ वरून

१९५७ ते १९६२ या कालावधीत कोल्हापूर नगरपरिषदेत ते काँग्रेसचे एकमेव सदस्य होते. त्यानंतर ते जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस झाले. याच दरम्यान डॉ. डी. वाय. पाटील आमदारही झाले. यानंतर विविध संस्थांचे ते सदस्य राहिले. मुंबई, पुणे आणि शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य होण्याचा मान देखील त्यांनी मिळविला आहे.

१९८० पासून डॉ. डी. वाय. पाटील मात्र राजकारणपासून थोडेसे लांब राहू लागले होते. शिक्षण क्षेत्राकडे त्यांचा कल अधिक वाढू लागला होता. बहुजन समाजातील मुलांना तंत्रशिक्षणची दारे खुली व्हावीत, यासाठी त्यांची धडपड सुरू झाली. आणि यांतून १९८३ साली रामराव आदिक एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.

तीन वर्षात म्हणजे १९८६ साली डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. गेल्या चार दशकात आता या शिक्षण समूहाचे वटवृक्षात रुपांतर झाले असून जवळपास २०० शाळा, कॉलेज कार्यरत आहेत. २००२ मध्ये पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे अभिमत विद्यापीठ झाले. त्याचे ते कुलपती राहिले.

## यांनी केले फोनद्वारे सांत्वन

**काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, कर्नाटकचे उद्योग मंत्री एम. बी. पाटील, खासदार प्रणिती शिंदे, गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी त्यांच्या कुटुंबीयांचे फोनद्वारे सांत्वन केले.**

ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे, हा ध्यास डी. वाय. पाटील यांनी आयुष्यभर जपला. अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून बहुजन समाजाला तांत्रिक शिक्षणाचे दरवाजे खुले केले. वैद्यकीय महाविद्यालय सुरू करून वैद्यकीय शिक्षणाची सोय कोल्हापूरसारख्या शहरात उपलब्ध करुन दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन केलेल्या कोल्हापूर, मुंबई आणि पुणे येथे अभिमत विद्यापीठ आणि १८० पेक्षा अधिक शाळा, महाविद्यालयातून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

डॉ. डी. वाय पाटील यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा सन्मान म्हणून काँग्रेसने त्यांची त्रिपुरा आणि बिहारच्या राज्यपालपदी नियुक्ती केली होती. त्यांनी पश्चिम बंगालच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभारही समर्थपणे सांभाळला होता. २०१८ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता.


शिक्षण आणि समाजसेवेतील अतुलनीय योगदानाबद्दल भारत सरकारने १९९१ मध्ये त्यांना 'पद्मश्री' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले. त्यांना विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांकडून मानद डॉक्टरेट तर शिवाजी विद्यापीठाने 'डी.लिट' पदवीने सन्मानित केले होते.

### मान्यवरांनी घेतले अंत्यदर्शन

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह कार्यकर्त्यांनी अंत्यदर्शन घेतले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, आमदार चंद्रदीप नरके, आमदार जयंत आसगावकर, माजी आमदार महादेवराव महाडिक, कुलगुरू डॉ. राजनिश कामत, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, जिल्हा पोलीस प्रमुख निलोत्पल, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन, माजी खासदार जयवंतराव आवळे, माजी मंत्री भरमूआण्णा पाटील, माजी आमदार बाबासाहेब पाटील-सरुडकर, संजय घाटगे, राजीव आवळे, ए. वाय. पाटील, भैय्या माने, अर्जुन आबिटकर, नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, माजी कुलसचिव डॉ. बी. पी. साबळे, गणपतराव पाटील, वैभव नाईकवडी, कर्नाटकचे आमदार गणेश हुक्कीरे यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेत श्रद्धांजली वाहिली.

05 AUG 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




# शिवाजी विद्यापीठामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यापीठामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ.राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

कुलसचिव डॉ.विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, डॉ.शरद बनसोडे, डॉ.रामचंद्र पवार, प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.शिवानंद यंकंची, डॉ.आशिष देशमुख, डॉ.नितीन कांबळे, डॉ.माधव भिलावे, डॉ.सुनिल गायकवाड, सुरेश बंडगर, प्रकाश चौगुले, सिमा कुंभार, दत्तात्रय भालचिम, जनार्धन सुरकुले, संजय पवार, संजय माने, दत्तात्रय पोतदार, विजय घोडके, शरद कांबळे, प्रतिक बुवा, कल्लाप्पा कारंडे आदी उपस्थित होते.

0 5 AUG 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : उद्घाटन सत्रात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत सोबत डॉ. सोमनाथ पवार, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. राजगुरू आणि डॉ. एस. आर. कुलकर्णी.

# गणित, संख्याशास्त्र हा 'एआय'चा पाया

## कुलगुरू डॉ. कामत यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया हा गणित आणि संख्याशास्त्रामध्ये असून विद्यार्थी व शिक्षकांनी यातील मूलभूत संकल्पना भक्कम करण्यासाठी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि सेंटर फॉर एक्सलन्स इन 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग" प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी प्राध्यापक डॉ. एस. आर. कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी, डॉ. शिर्के, डॉ. राजगुरू, डॉ. पवार यांनी मार्गदर्शन केले. डॉ. महाडिक यांनी स्वागत केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी प्रास्ताविक केले. अंजली मंगोरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले.

0 5 AUG 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



ज्ञान-विज्ञान

# वादळातलं प्रकाशाचं बाळ!

डॉ. व्ही.एन. शिंदे

**आजही जगभर आईनस्टाईन, न्यूटन यांच्यानंतर कोणाचे नाव तोंडी येत असेल तर तो एडिसन. या एडिसनच्या भेटीसाठी आतुरलेला एक तरुण अमेरिकेत पोहोचला. कफल्लक अवस्थेत असलेला पण ज्ञानाचा ध्यास घेतलेला हा तरुण अमेरिकेत राहिला. जगण्यासाठी पैसे लागतात याचेही त्याला कधी भान नव्हते, त्यामुळे निधनावेळीही तो कफल्लकच राहिला. अनेकांनी त्यांच्या ज्ञानाच्या सहाय्याने पैसे कमावले, श्रीमंत झाले; तो मात्र त्यांच्याशी कृतज्ञच राहिला. अखेर त्याचे नाव ब्रँड बनले ते म्हणजे टेस्ला.**

ऑस्ट्रीयन साम्राज्याच्या बाल्कन पेनिन्सुला डोंगररांगेतील स्मिल्जान या गावात १० जुलै १८५६ च्या रात्री पूर्ण अंधारून आले होते. ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट सुरू होता. त्यावेळी एक बाळ जन्माला आले. दायी म्हणाली, 'हे कसलं वादळाचं बाळ.' तर बाळाची आई चमकणाऱ्या विजेकडे पहात म्हणाली, 'नाही, हे तर प्रकाशाचं बाळ आहे.' बाळानेही दाई आणि आईचे दोघींचेही शब्द खरे ठरवले. आयुष्यभर वादळाशी सामना करत, सर्वांना प्रकाश देणारे संशोधक ठरले. हे बाळ म्हणजेच निकोला टेस्ला. त्यांचे वडील धर्मगुरू होते. ते कविताही करत. आई गृहिणी होती, त्यांना उपकरणांचे ज्ञान होते. निकोलांनी वडिलांकडून कवीमन आणि आईकडून तंत्रज्ञान हे गुण घेतले.

त्यांचे सुरुवातीचे शिक्षण घरीच सुरू झाले. एका भावाचे घोडेस्वारीचे शिक्षण घेताना निधन झाल्याने या भावंडांना कायम आई-वडिलांच्या देखरेखीखाली ठेवले जात असे. पुढे कुटुंब १८६२ मध्ये गॉस्पिकला स्थलांतरीत झाले. तेथील हायर रिअल जिम्नॅशियममध्ये त्यांनी प्रवेश घेतला. या शाळेत त्यांचे नाव अत्यंत हुशार विद्यार्थ्यांच्या यादीत अग्रभागी असे. मात्र, त्यांना एक विचित्र प्रकारचा त्रास होत असे. त्यांना झोपेमध्ये स्वप्न पडत असे. पहिल्या दिवशीच्या स्वप्नात त्यांना काहीतरी करत असल्याचे दिसे. दुसऱ्या दिवशी त्या स्वप्नाचा उत्तरार्ध दिसत असे. अशा स्वप्नांनी ते अस्वस्थ होत. ते स्वप्नाचे जे वर्णन करत, त्यावरून हा मुलगा थापा मारतो असे लोकांना वाटे. त्यांचे काका मात्र हे सर्व शांतपणे ऐकत. एकदा निकोला यांनी, 'एका धबधब्यात आपण यंत्र जोडत असल्याचे आणि दुसऱ्या दिवशी ते यंत्र जोडल्यानंतर सर्वत्र प्रकाश पडल्याचे', स्वप्न पडल्याचे सांगितले. काकांच्या त्यातील धबधब्याचे वर्णन, नायगारा धबधब्याचे असल्याचे लक्षात आले. ज्या मुलाने साधे गावही सोडले नाही, तो या धबधब्याचे वर्णन कसे करू शकतो असा प्रश्न काकांच्या मनात आला. या मुलाकडे काहीतरी अलौकिक आहे असे काकाचे मत झाले. अर्थात, हे स्वप्न त्यानंतर ३० वर्षांनी प्रत्यक्षात उतरले.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

त्यांनी पुढे तंत्रनिकेतन स्कूलमध्ये प्रवेश घेतला. गणित, भौतिकशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी विषयातील अभ्यासण्यास सुरुवात केली. मात्र, शेवटच्या वर्षाच्या शेवटच्या सत्रामध्ये त्यांची अनुपस्थिती जास्त असल्याने परीक्षा दिली नाही. अर्थातच, त्यांना कोणतीही पदवी किंवा पदविका प्राप्त करता आली नाही. १८७८ मध्ये त्यांनी अचानक सर्व कौटुंबिक पाश तोडले आणि निघून गेले. त्या काळात त्यांना नैराश्येने ग्रासले होते. त्यांनी आत्महत्या केली असावी असे त्यांच्या मित्रांना वाटे. ते मारबर्गला गेले. तार कंपनीत कनिष्ठ अभियंता म्हणून काम करू लागले. त्याचसोबत त्यांनी चार्ल्स फर्डिनांड विद्यापीठात प्रवेश घेतला, मात्र तेथेही त्यांनी शिक्षण अर्धवट सोडले. दरम्यान, त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

निकोलांचे वाचन अफाट होते आणि ते एकपाठी होते. एकदा वाचलेले नजरेसमोर जसेच्या तसे येत असे, त्यामुळे त्यांची कामे करताना ते कोणतेही डिझाईन न काढता काम पूर्ण करत. विद्यापीठातील शिक्षण सोडल्यानंतर ते बुडापेस्टला गेले. तेथे एका तार कंपनीत नोकरी करताना त्यांच्या कार्यकौशल्यामुळे ते मालक चार्ल्स बेचलर यांचे आवडते अभियंते बनले. निकोला यांनी बेचलर यांच्याकडे अमेरिकेला जाण्याची आणि एडिसनबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली. बेचलर यांनीही त्यांच्या कर्तृत्त्वाला वाव देण्यासाठी एडिसनना देण्यासाठी एक चिठ्ठी दिली आणि त्यांना जहाजाने अमेरिकेला पाठवले. मात्र, जहाजावरून उतरताना त्यांच्या लक्षात आले की, एक कवितेची वही सोडता त्यांचे सर्व साहित्य चोरीला गेले आहे. त्यांच्याकडे केवळ चार सेंट कवितेची वही आणि बेचलर यांनी दिलेले पत्र एवढेच शिल्लक राहिले होते. तिकीट नसल्याने त्यांना चक्क जहाजावरून बाहेर फेकण्यात आले.

कसेबसे ते न्यूयॉर्कला एडिसन यांच्या कार्यालयात पोहोचले. त्यांनी बेचलर यांनी दिलेले पत्र एडिसनना दिले. 'जगातील दोन महान व्यक्ती मला ठाऊक आहेत. एक आपण आहात आणि दुसरी आपल्यासमोर बसलेली व्यक्ती आहे', अशा आशयाचे ते पत्र होते. चाणाक्ष एडिसननी त्यांना तात्काळ कामावर ठेवले. त्यावेळी अमेरिकेत एडिसन यांची कंपनी एकादिष्ट म्हणजेच डीसी विद्युत पुरवठा करत असे. त्यासाठीच्या जनरेटरपासून घरातील विद्युत देखभालीपर्यंत सर्व बाबी कंपनीमार्फत केल्या जात. निकोला एडिसन यांच्या कंपनीमध्ये काम करू लागले. कंपनीतील तांत्रिक चुकांमुळे कंपनीचे लाखो डॉलर्सचे नुकसान होत असल्याचे निकोलांच्या लक्षात आले. त्यांनी एडिसनना ही बाब सांगितली. एडिसन यांना ते पटले नाही. त्यांनी मजेत म्हटले, 'तू हे करून दाखवलं तर तुला ५०००० डॉलर्स बक्षीस.' मग काय, निकोलांनी दिवसाची रात्र केली आणि आपले म्हणणे सिद्ध केले. ठरल्याप्रमाणे एडिसनना बक्षिसाची रक्कम मागणी केली. मात्र, एडिसननी आठवड्याला दहा डॉलर्स वेतन वाढवून देण्याचे मान्य करत, ५०००० डॉलर्स देण्यास नकार दिला. एडिसननी शब्द फिरवल्याने निकोलांनी कंपनी सोडली.

तोपर्यंत अमेरिकेत निकोलांचे विज्ञानविश्वात नाव झाले होते. रेल्वेचे ब्रेक विकसित करणारे धनाढ्य लिव्हिंगस्टननी निकोलांना आपले भागीदार बनवत, निकोलांच्या नावाने 'टेस्ला' कंपनी सुरू केली. निकोलांनी नव्या-पद्धतीचा विद्युत दिवा शोधला. मात्र, कंपनीतील भागीदारांनी पैसे काढून घेतल्याने कंपनी बंद पडली. त्यांनी आजच्या वापरातील प्रत्यावर्ती विद्युत निर्मिती जनित्र विकसित केले. त्यांनी अनेक पेटंट मिळवली. रेडिओच्या शोधाचा जनक म्हणून मार्कोनींना ओळखले जाते, मात्र या तंत्राचे खरे जनक निकोलाच आहेत. त्यांनी प्रथमच सर्व धर्म परिषदेत प्रत्यावर्ती विद्युत वापरून रोषणाई केली. एकादिष्ट विद्युतपेक्षा, प्रत्यावर्ती विद्युत सुरक्षित असल्याचे सिद्ध केले, त्यामुळेच आज घराघरांत वीज पोहोचली. त्यांनी अनेक स्वप्ने पाहिली, प्रत्यक्षात उतरवली. नायगरा धबधब्यावरील विद्युतनिर्मिती केंद्र त्यांनी आराखड्याचे रेखाटन न करता पूर्ण केले. वाहकाविना विद्युत पाठवण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे असतानाच त्यांचे निधन झाले. या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य कोणी देऊ नये यासाठीच टायटॅनिक बुडवल्याची चर्चा आहे.


vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

जनसंपर्क कक्ष
0 5 AUG 2026
सिंधुदुर्ग समाचार
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विश्वात्मक दृष्टीचे प्रगल्भ विचारवंत : डॉ. श्रीपाल सबनीस

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** बहुसांस्कृतिक जाणीवा असणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे विश्वात्मक दृष्टीचे साहित्यिक होते, तसेच प्रगल्भ आणि परिपक्व विचारवंत म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने जयंतीनिमित्त आयोजित 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बीजभाषण करताना ते आज बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.



अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि विचारांचा व्यापक पट उलगडताना सबनीस यांनी त्यांना केवळ शाहिर किंवा लोककलावंत म्हणून मर्यादित न पाहता, समतेचा, स्वातंत्र्याचा आणि मानवतावादाचा साक्षेपी विचार मांडणारा विश्वात्मक दृष्टीचा साहित्यिक म्हणून अधोरेखित केले. ते म्हणाले, अण्णा भाऊंच्या लेखणीमध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्य आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष दिसून येतो; मात्र त्याचबरोबर त्यांच्यात संवादशीलता, समन्वयशीलता आणि सर्वसमावेशकताही होती. मार्क्स, आंबेडकर, फुले, शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर, तुकडोजी महाराज अशा विविध वैचारिक-सांस्कृतिक प्रवाहांचे संचित त्यांनी आत्मसात केले होते. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या, शाहिरी, वगनाट्य आणि लोकनाट्यांमधून महाराष्ट्र, भारत आणि विश्वमानवतेचा व्यापक विचार व्यक्त होतो. त्यांचे साहित्य हे केवळ दलित किंवा एका जातीपुरते मर्यादित नसून सर्वसमावेशक, बहुसांस्कृतिक आणि जागतिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे आहे, असे सबनीस यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यविश्वाचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनातील लोकजीवनाची खोल जाण, सामान्य माणसाविषयीची आस्था आणि सामाजिक वास्तवाचे प्रटस्थ चित्रण प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या कथांमधून केवळ दुःख, दारिद्र्य किंवा संघर्षच नव्हे, तर माणूसपणावरचा अढळ विश्वास आणि परिवर्तनाची उमेदही व्यक्त होते. आजच्या काळात अण्णा भाऊंच्या विचारांची अधिकाधिक गरज असून त्यांच्या साहित्याचा अभ्यास समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अण्णा भाऊंनी मांडलेली समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची भूमिका ही नव्या पिढीला दिशा देणारी असून, त्यांचे साहित्य हे केवळ वाचनापुरते न राहता आचार-विचारांना प्रेरणा देणारे जीवनमूल्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, महामानवांची जातीजातींत वाटणी होणे गैर असून केवळ अस्मिता म्हणून त्यांना मिरविण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा गांभीर्यपूर्वक स्वीकार केला जाणे आवश्यक आहे. अण्णा भाऊ साठे यांनी लौकिकार्थाने शिक्षण नसतानाही निसर्गवाचन, परिसर वाचन, माणसांचं वाचन, वास्तव जीवनातील चटके आणि अनुभव यांच्यावर चिंतन केले. जागतिक साहित्याचे वाचन केले. त्यातून त्यांच्यात लेखन प्रेरणा जागल्या आणि वास्तव, आदर्श व त्यांच्या स्वप्नातील समाज यांचा मेळ घालत त्यांनी साहित्य निर्मिती केली. हा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

**'अण्णा भाऊंचा सांस्कृतिक हस्तक्षेप मौलिक'**

उद्घाटन सत्रानंतर झालेल्या परिसंवादात अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून तत्कालीन अभिजन सांस्कृतिक जाणीवांमध्ये जो हस्तक्षेप केला, तो अत्यंत मौलिक स्वरुपाचा होता. त्यामुळे साहित्याच्या मुख्य प्रवाहामध्ये दलित, शोषितांचा आवाज बुलंद झाला, असा सूर निघाला. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गिरीष मोरे होते. परिसंवादात डॉ. मेघा पानसरे यांनी 'अण्णा भाऊंचे आंतरराष्ट्रीयत्व', जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'अण्णा भाऊंच्या साहित्यातील फुले-आंबेडकरी जाणीवा' आणि डॉ. अंबादास सकट यांनी 'महाराष्ट्राचे शेक्सपिअर अण्णा भाऊ साठे' या विषयांवर मांडणी केली.

यावेळी अनिकेत कांबळे या विद्यार्थ्याने अण्णा भाऊ साठे यांना रॅप साँगद्वारे अभिवादन केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शुभदा पाटील यांनी परिचय करून दिला. मनीषा कदम-देसाई, सरिता बनके यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. कबीर दास, डॉ. उत्तम सकट, डॉ. नीलेश बनसोडे, विलास सोयम, अनिल म्हमाणे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.